## ₹ वाणिज्य वार्ता

# वाघ-बकरीचा एक्स्ट्रॉ स्ट्रॉंग चहा बाजारात

**औरंगाबाद** : गणेशोत्सवानिमित्त वाघ-बकरी चहाने मराठवाड्याची खासियत असलेला एक्स्ट्रॉ स्ट्रॉंग मिली डस्ट चहा बाजारात आणला आहे.

राज्यात प्रिमियम वाघ-बकरी, स्ट्रॉंग मिली, नवचेतन चहा, इंटरनॅशनल गुड मॉर्निंग चहाला पसंती दिली जात आहे. वाघ-बकरी ग्रुपचे कार्यकारी संचालक पराग देसाई म्हणाले की, एक्स्ट्रॉ स्ट्रॉंग मिली डस्ट चहा ही मराठवाड्याची खासियत आहे. या चहासाठी आम्ही ग्राहकांचे सर्वेक्षण व संशोधन केले. बाजारपेठेतील ३० टक्के वाटा काबीज करण्याचे आमचे लक्ष समोर ठेवून आम्ही हा नवा चहा बाजारात सादर केला आहे. मिली आणि नवचेतन या ब्रँड्सच्या माध्यमातून शहरी आणि ग्रामीण भागातील ग्राहकांना समोर ठेवून काम केले जात आहे. हे दोन्ही ब्रँड्स जाड चहापत्ती आणि बारीक भुकटीमध्ये बाजारपेठेत उपलब्ध आहेत.